# यशवंतराव चव्हाण : यांना श्रद्धांजली

**डॉ. अनिल काकोडकर**

आत्ताच आपण महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती : सामाजिक व आर्थिक उन्नतीचा मार्ग या विषयावर अभ्यासूंना प्रेरित करणारे उत्कृष्ट असे विवेचन ज्यांच्याकडून ऐकलेत ते आजचे प्रमुख वक्ते प्रा. अरूण निगवेकर, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, आंतरराष्ट्रीय दिर्घायू केंद्र या संस्थेचे मानद अध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले, डॉ. जी.आर. राठोड, डॉ. बी.टी. लावणी, डॉ. बेडेकर, बऱ्याच मोठया प्रमाणावर उपस्थित असलेली शिक्षणक्षेत्राशी निगडित तज्ञ मंडळी आणि बंधुभगिनींनो. सर्वप्रथम मी भारती विद्यापीठ आणि आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र या दोन्ही संस्थांचे आभार मानू इच्छितो. आज या मोठया महत्वाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी म्हणून जी संधी दिलीत त्याबद्दल आणि तसेच कै. यशवंतरावजी चव्हाण जन्मशताब्दी महोत्सव वर्षाच्या कार्यक्रमाची सुरूवात आज आपण करत आहोत त्या निमित्ताने यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्मृतीस अभिवादन करण्याची संधी मला मिळाली त्याबद्दलही मी या दोन्ही संस्थांचे आभार मानू इच्छितो.

यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राला आणि देशाला मोठया आव्हानात्मक परिस्थितीत दिलेले समर्थ नेतृत्व, त्यांची दूरदृष्टी, त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत उचलेला महत्वाचा वाटा या बाबत आपण सर्वजण परिचित आहोतच. त्यांचे व्यक्तिमत्व ज्याला आपण कंप्लीट पर्सनॅलिटी म्हणतो अश्या प्रकारचे होते. ते काही केवळ राजकारणी नव्हते. राजकारण, समाजकारण, व्यासंगीपणा, डोळस दृष्टी अशा अनेक गोष्टी त्यांच्याबद्दल सांगता येतील. आपण याआधी डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्याकडून या बाबतचे विवेचन ऐकले पण आहे. यशवंतराजींच्या काळात — त्यांच्या आधीपासून, त्यांच्या वेळेला आणि त्यांच्यानंतरसुध्दा — महाराष्ट्रात बऱ्याच वेगवेगळया प्रकारची वैचारिक, राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतरे झाली. नवीन विचार देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राने बऱ्याच बाबतीत पुढाकार घेतला. महाराष्ट्राला नवीन विचार करायची,

Speech at Bharati Vidyapeeth Deemed University and International Longevity Centre – India on 3rd August 2012 as a part of inaugural function of Yashwantrao Chavan Centenary Celebrations.

भविष्याच्या दृष्टीने कशी तयारी करावी त्याबद्दलची रूपरेषा व आराखडा निर्माण कराण्याची आणि तो अमंलात आणून देशापुढे एक नवीन मॉडेल निर्माण करण्याची समृध्द अशी परंपर आहे. महाराष्ट्रात जे सुरूवातीला घडले ते मग संबंध देशभर पसरले असे बऱ्याच वेळेला घडलेले आहे.

मला असे वाटते की, आज आपण उच्चशिक्षणाच्या बाबतीत एका विशिष्ट वळणावर आहोत. आजचे अर्थकारण झपाट्याने ज्ञानावर आधारलेले असे होत आहे. सहाजिकच अधिकाधिक संख्येने तरूण मंडळी उच्च शिक्षणाकडे वळत आहेत. त्या सर्वांना ऊत्कृष्ट व समयोचित उच्चशिक्षण उपलब्ध होणे ही आजची एक मोठी गरज आहे. विशेषत: केंद्र सरकारने या बाबत मोठा पुढाकार घेतलेला आहे. शिक्षणासाठी लागणारे आर्थिक पाठबळ कितीतरी पटीने वाढलेले आहे आणि या संदर्भात शिक्षणतज्ञ काय करू शकतील ते आपण डॉ. निगवेकरांच्याकडून ऐकले. मोठ्या संख्येने ही जी तरूण मंडळी उच्च शिक्षणक्षेत्रात येणार आहेत, विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळण्याची व्यवस्था करण्याची जी आवश्यकता भासणार आहे, ती जर चांगल्या प्रकारे नाही केली तर त्याचे उलट परिणाम काय होऊ शकतील हा एक मोठा महत्वाचा प्रश्न आहे आणि या बाबत पुढील पावले अत्यंत तातडीने टाकण्याची आवश्यकता आहे. मी तर असे म्हणेन की, पब्लिक फंडिंगच्या प्राथमिकता काय असाव्यात असा विचार करता अर्थातच ही प्राथमिकता एकूण विकासावर त्या फंडिंगचा सर्वात चांगला प्रभाव कसा पडेल यावर अवलंबून असणे अपेक्षित आहे आणि त्या दृष्टीने जर बघितले तर शिक्षणक्षेत्रातलं, विशेषत: उच्च शिक्षण क्षेत्रातल इन्व्हेस्टमेंट हे आजच्या घडीला सर्वोच्च प्राथमिकता ठरणे ही अपरिहार्य अशी गोष्ट आहे. निर्णयकर्त्यांना जितक्या लवकर याबद्दल जाग येईल आणि याबाबत प्रत्यक्ष अमंलबजावणी सुरू होईल, तितके ते राज्याच्या पुढच्या प्रगतीच्या दृष्टीने व भावी वाटचालीच्या दृष्टीने ते महत्वपूर्ण ठरेल.

साधारणपणे विद्यापीठे व त्यांचे शिक्षण व संशोधन विषयक कार्यक्रम हे शहरी वातावरणाशी व गरजांशी अधिक जवळीक साधून असतात. मला असे वाटते की, ग्रामीण भागात चांगल्या प्रकारचे विद्यापीठ स्तरीय शिक्षण आणि संशोधन होणे अत्यंत महत्वाचे

आहे. ते केवळ कॉलेजेस उघडून पूर्ण होईल असे मला वाटत नाही. नवीन कॉलेजेस उघडणे, त्याची व्यवस्था करणे हे आवश्यक आहे हे खरे.

पण खरे उच्च शिक्षण हे विद्यापीठांच्या चांगल्या प्रकारे विकसित कँपस वरील कार्यक्रमाद्वारे होत असते, ज्याला आपण सर्वांगीण शिक्षण म्हणतो. ते समाजातील विविध प्रक्रियांचे प्रतिबिंब असलेल्या कँपस वरील कार्यक्रमातून होते. त्यात वेगवेगळे भाग आले, विशेषत: संशोधन. समाजात ज्या काही समस्या आहेत किंवा ज्या काही नवीन समस्या निर्माण होऊ पाहत आहेत, त्यांच्याबाबतीत सखोल अभ्यासावर आणि संशोधनावर आधारलेले एखादे सोल्युशन पुढे आणणे, हे काम कँपसवरच्या कार्यक्रमा द्व रे जास्त चांगल्या प्रकारे होऊ शकते. तर अशा प्रकारचे अधिक कँपस निर्माण करणे आणि तेही ग्रामीण भागात निर्माण करणे, ही पण त्यातल्या त्यात एक महत्वाची प्राथमिकता असावी असे मला वाटते. ग्रामीण भागातल्या विकासाला अधिक प्राथमिकता देणे भारताच्या संतुलित विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षणाकडे आपण विविध दृष्टीकोनातून बघितले पाहिजे. एक म्हणजे लाइव्हीहूड. उपजिवीकेची चांगली क्षमता शिक्षणामुळे साध्य व्हावी. त्याचबरोबर शिक्षणामुळे कालानुरूप नवीन विचारप्रवाह पुढे यावयास हवेत. बऱ्याच वेळा आपण म्हणतो की, विद्यापीठातून सामाजिक परिवर्तनाची क्रांती पुढे येऊ शकते किंवा येते. पण त्याही पुढे आणखी दोन गोष्टींवर पण खूप लक्ष केंद्रित करायला पाहिजे. एक म्हणजे संशोधन किंवा ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्याचे काम आणि दूसरे म्हणजे या नवनिर्मित ज्ञानावर आधारलेले इनोव्हेशन. असे टेक्नॉलॉजी इनोव्हेशन कि ज्याच्यामुळे समाजामध्ये संतुलित विकास व संपत्तीची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करणे शक्य व्हावे. ज्ञान, कौशल्य, संशोधन व टेक्नॉलॉजीकल इनोव्हेशन या चारही बाबतीत चांगल्या प्रकारे लक्ष दिले तरच परिपूर्ण असे विद्यापीठीय शिक्षण आपण घडवू शकू. अश्या प्रकारची सर्वांगीण उच्च शिक्षणाची सोय सर्व इच्छुक तरूणांसाठी विशेषत: ग्रामीण भागातील तरूणांसाठी उपलब्ध असणे ही आजची मोठी गरज आहे. आता हे सगळं व्हायचं कसं — आमची जी समिती होती त्या समितीने या सर्व बाबींचा ऊहापोह केलेला आहे. त्या सर्व बाबींच्या

अनुषंगाने पुढे जाण्यासाठी म्हणून काय काय करायला पाहिजे त्याच्या प्रॅक्टिकल स्टेप्स समितीच्या रिपार्ट मध्ये दिलेल्या आहेत आणि आपण अशी आशा करू या कि त्या रिपोर्टच्या अनुषंगाने काही निर्णय लवकरच घेतले जातील आणि या बाबतची वाटचाल पुढे सुरू होईल. असं म्हणतात की शिक्षण हे असे क्षेत्र आहे कि ज्यात इतर कुठल्याही क्षेत्रापेक्षा अधिक रिपार्टस उपलब्ध आहेत. त्याच्यामध्ये केवळ तीन अधिक रिपोर्टसची भर पडली या पेक्षा अधिक ठोस परिणाम पुढे येतील अशी आपण आशा करूया. कारण ते अत्यंत आवश्यक आहे. आणि मला असे वाटते की ते अक्षरश: अपरिहार्य आहे.